लिहून घेणार व तुमचे पश्चात तुमचे वंश वाली वारसदार वगैरे यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

२६) सदर उपरोक्त फ्लॅट मिळकतीसाठी लागणारे इलेक्ट्रीक मीटर कनेक्शन व पाण्याचे कनेक्शन कामी जो काही खर्च येईल त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी तुम्ही लिहून घेणार यांचेवर आहे व राहील. तसेच सदरचे संपूर्ण इमारतीसाठी स्वतंत्र इलेक्ट्रीक डी.पी. बसविणे गरजेचे असल्याने त्याकामी येणारा सामाईकातील खर्च खरेदीखतापूर्वी देणे तुम्ही लिहून घेणार यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

२७) सदर वर सविस्तर वर्णन केलेली फ्लॅट मिळकत मे.कलेक्टर साहेब जळगांव, शहर महानगरपालिका जळगांव, टाऊन प्लॅनिंग जळगांव यांचे हद्दीतील आहे. सबब त्यांचेकडील नियमावली खरेदीखतानंतर तुमचेवर बंधनकारक राहतील.

२८) लिहून देणार यांनी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) अंतर्गत सदर **'समृध्दी अपार्टमेंट'** हा प्रकल्प नोंदणी क्रमांक .... दिनांक .... रोजी महारेरा अधिकारी यांचेकडे नोंदणीकृत केलेला आहे.

२९) सदर प्रस्तुत दस्तामध्ये भविष्यात काही एक सुधार किंवा अतिरिक्त अटी व शर्ती नमुद करावयाच्या असतील तर लिहून देणार व लिहून घेणार यांच्यामध्ये सामंजस्याने व सहमतीने ते करतील.

३०) सदर वर सविस्तर वर्णन केलेली फ्लॅट मिळकत बाजार मुल्य वरतक्ता सन २०१७-१८ मधील विभाग क्रमांक ७.२१९अ मध्ये समाविष्ट आहे. सदर विभागातील सदनिकेचा दर प्रती चौ.मी. रू.२७,२००/- मात्र आहे. सदर उपरोक्त फ्लॅट मिळकतीची बाजार भावाने किंमत रू............/- मात्र येते. परंतु प्रत्यक्षात मोबदला किंमत रू........../- अक्षरी रूपये --------------- मात्र असल्याने सदरचे किंमतीवर ६% प्रमाणे रक्कम रू.............../- मात्रचा स्टॅम्प ई-चलनाने दिलेला असुन नोंदणीकामी आवश्यक असलेली नोंदणी फी रू............/- मात्र ई-चलनाने दिलेली आहे व त्याच्या प्रती सदरचे दस्तासोबत दिलेल्या आहेत.

येणेप्रमाणे तुमचेपासुन वर नमुद केल्याप्रमाणेची रक्कम मिळाली. सदरचा सौदापावती करारनामा राजीखुशीने, स्वसंतोषाने, समजून, उमजून, वाचून घेऊन, उभयसाक्षीदारांसमक्ष सह्या करून, पान क्रमांक १ वर नमुद केलेल्या तारखेस जळगांव मुक्कामी लिहून दिला असे. **(टाईपसेट द्वारा : रमेश एम.मुळे, जळगांव)**

कोणार्क हौसींग अॅन्ड कन्स्ट्रक्शन

चे प्रोप्रायटर श्री.प्रमोद मधुकर घुगे

- लिहून देणार -

श्री. --------------------

- लिहून घेणार -

साक्षीदार

१.	२.
नांव :	नांव :
पत्ता :	पत्ता :